**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक - ४१७१ दिनांक :- १८ ऑक्टोबर, २०२२

प्रसिद्धीपत्रक

**मराठी विश्वकोश खात्रीशीर माहिती मिळवण्याचा ज्ञानकोश** - डॉ. शामकांत देवरे

म्हाडा मुख्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

मुंबई, दि. १८ ऑक्टोबर, २०२२:- आधुनिक युगात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रांत झपाट्याने बदल घडत आहेत. कोणत्याही विषयाची माहिती चुटकीसरशी प्राप्त करून घेण्याचे वेध अवघ्या जगाला लागलेले असतानाच, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्याच्या उद्देशाने मराठी विश्वकोश मोबाईल ॲपच्याद्वारे सर्वांसाठी मोफत उपलब्ध करून दिला आहे आणि त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव डॉ. शामकांत देवरे यांनी आज केले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती अर्थात वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून आज वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात 'मराठी विश्वकोशाचे दैनंदिन उपयोजन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. देवरे बोलत होते.

याप्रसंगी श्री. देवरे म्हणाले की, मराठी विश्वकोशाचे १ ते २० संहिता खंड जनतेस marathivishwakosh.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करून संशोधकांना, अभ्यासकांना जागतिक दर्जाचे ज्ञान आणि खात्रीशीर माहिती उपलब्ध करून देणे हा मराठी विश्वकोशाचा प्रमुख उद्देश आहे. तसेच कुमार वयातील मुलांचा बौद्धिक विकास व्हावा व जगभरातील ज्ञान सोप्या व सरळ भाषेत प्राप्त व्हावे, या उद्देशाने कुमार विश्वकोशची निर्मिती करण्यात आली आहे. सध्याच्या विज्ञानयुगात कुमारवयीन वाचकांना संगणकाची ओढ अधिक असते. म्हणूनच कुमार विश्वकोश ग्रंथरूपाने तसेच मराठी विश्वकोशाच्या संकेतस्थळावरही सर्वांना वाचनासाठी मोफत उपलब्ध करून दिला असल्याचे डॉ. देवरे यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी अभ्यासक श्री. नितीन वाघ म्हणाले की, मराठी विश्वकोशाचे २० खंड प्रकाशित झाले असून जुन्या नोंदींची

फेररचना काळाच्या ओघात कराव्या लागणाऱ्या दुरुस्ती, नव्या नोंदीची भर हे काम आजही अव्याहतपणे सुरूच आहे. नवतंत्रज्ञान जागतिकीकरणाच्या युगात विश्वकोशामध्ये नव्या युगाचा संदर्भ महत्त्वाचा असतो. त्यामुळे मराठी विश्वकोशासारख्या अभ्यास साधनांचे सामाजिक संदर्भातील मूल्य मोठे आहे. ज्ञानापासून वंचित राहिलेल्या घटकांपर्यंत विश्वकोश पोहोचावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे श्री. वाघ यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील, म्हाडा कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. मोहनराव कोळी आदींसह म्हाडातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण



